# किना-याला



तरंगत आलो लाटांचे हेलकावे खात किना-याला
वाळूच्या ओलाव्यात रात्रभरीच्या रुतण्याला

माझ्या चिराकप्प्यात लपतात अटनाला आलेले शिंपले
विकल होतात ते पंहाटे दवबिंदुंच्या प्राशनाला
मोत्यांच्या गर्भधारणेला
त्याना हुसकावणी देण्या येतात दूरवरचे पक्षी
चंचुप्रहारानं त्याना फोडण्यास, पण वैतागतात
आणि माझ्यावर वाढल्या शेवाळीला इथंतिथं टोचून
उडुन जातात, . . . दुसरा ओंडका शोधीत
माझ्यासारखाच अजुर्दा, . . . उदासीन

असू का आम्ही एकाच झाडाचे दोन तुकडे
निरर्थक आकाराचे?
कोणत्या वृक्षाचं मी खोड होतो?
वटापिंपळाचं की बुद्धाच्या बोधीचं?
चंदनाचा मला गंध नाही
कडुलिंबाची कडवट नाही
आठवणही नाही पडलेल्या कु-हाडीच्या घावाची
उरते आठवणीला जडलेल्या शेवाळांची हिरवळ
अणिमांच्या वसाहतीला, . . . किना-याला

त्यांच्यावर स्वारी करण्यास तुरुतुरु चढतील माझ्यावर
किना-यावर इवलाले खेकडे
मी मात्र रुतूनच राहीन वाळूत ओहटीच्या आकसात
क्षितिजांचा अंत शोधीत

दूरच्या वृक्षांवर पानांची तोरणं दिमाखानं डोलतात
अशाच का झाडाचं मी खोड होतो
पानामुळांच्या नात्याचं?
विसरला असेल का तो
नवी फांदी फुटता जुन्या जखमेला, . . . मला?

ओरसाच्या दर्यावर येतील नव्या भरतीच्या लाटा
काळाच्या पर्यटनाला पुन्हा हेलकावे देण्याला
तरंगत तरंगत दूरच्या दुस-या किनारी रुतण्याला. .

--- विजय पाठारे